५०३३१/३२

कायम विनाअनुदानित तत्वावर

विनाअनुदान तत्वावर

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि /०२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 16 NOV 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

शिक्षण प्रमुख प्रशासन अधिकारी/
महानगरपालिका/नगरपालिका/शिक्षण मंडळ,

विषय :- सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत. ( माध्यम - इंग्रजी )

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-पिएलएस/ १०९५/४९१ प्राशि-३ दिनांक १३.११.९५

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमुद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९९५ पासून इयत्ता १ ली ते सन ९५-९६ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्रत्येकी एका तुकडीस शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदानित तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदानित तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | लक्ष्मीनारायण ट्रस्ट, सी ९/१, पिंपरी कॉलनी, पुणे-४११०१७. | भगवती इंग्लिश मिडीयम स्कूल, रुपीनगर, तळवडे | १ ली व दुसरी च्या प्रत्येकी एका तुकडीस | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

...क्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पद्धती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे ...न केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

...विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या अटींचे आणि शिक्षकांचे स्वरूपात ...ले पाहिजेत.

...वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये ... विधायक ...करणे, तसेच वक्तशीरपणा, शिस्तबद्धपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यात बिंबवणे...

...ठिकाणी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादी मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार...

...त्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपद्धतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

...शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम ...याची खबरदारी घेणे आवश्यक आहे..

...ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरू ...ास दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

...परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम ...डे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी ...येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

...ही पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या ...निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी... ...व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तदनंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे ...प्रस्तावित प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा. असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ...तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर ... ...सी कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत ...ावी.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १

स्वाक्षरीवर शि. उ. सं. यांची सही आहे.

प्रतिलिपी सादर:
१ सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
...प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
...शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण मंडळ...
...सद / अध्यक्ष लक्ष्मीनारायण ... ट्रस्ट, ... पिंपरी कॉलनी, पुणे-४११०१८

---

---

---

क्रमांक–शिक्षण/खाप्राशा/३/ ... /२०
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी चिंचवड महानगर ... पिंपरी – १८.
दिनांक – २८/७/२०

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
मारवंती इंग्लिश स्कूल, ...

विषय :– कायम विना अनुदान तत्वावरील ... मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना नैसर्गिक वाढीचा/अतिरिक्त तुकडया मंजूर करणे ... [इंग्रजी माध्यम]

संदर्भ :– १] शासन निर्णय क्रमांक व्हीएनए/१००२/[१०००/०२]/प्राशि–३ दि. १४ जानेवारी २००३.
२] आपणाकडील दि. २८/ /०४ चा प्रस्ताव.

संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन आपणाकडून प्राप्त ... प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद इयत्ताच्या नैसर्गिक / अतिरिक्त ... २००३ – २००४ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविलेल्या ... अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडी ... नैसर्गिक ... अतिरिक्त | विना अनुदानित / कायम विना अनुदानित तत्वावर |
|---|---|---|---|---|---|
| | मारवंती इंग्लिश [illegible] | इंग्रजी | इ. ३ री ते इ. ५ वी | [illegible] | [illegible] |

शाळेने ... वर्ग अथवा तुकडी मंजूरीसा... अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१] शाळेत शासनाने वेळोवेळी विहीत केल्यानुसार ... अर्हता आवश्यक असणारा कर्मचारी वृंद शासनाने ... वेतनश्रेणी व सेवा शर्तींच्या अधिन राहून ... डी. एड. ]

[कृ. ...]

२] सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दयावयास हव्यात.

३] सदर शाळेने स्वच्छता गृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली केलेली असावयास हवी.

४] शाळेने शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५] सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेतील पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६] सदर शाळेच्या तुकडीत विद्यार्थी संख्या नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

वरील बाबींची पूर्तता करुन लेखी अहवाल एक महिन्यात सादर करावा.

प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८.

प्रत :- माहितीसाठी.

१] मा. शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/ ४००/१६
पुणे १ दिनांक :- /४/२०१६
११/७/१६

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
श्री लक्ष्मीनारायण ट्रस्ट, रुपीनगर, पिंपरी कॉलनी, पिंपरी, जि. पुणे संचलित भगवंती इंग्लिश मेडीयम स्कुल, तळवडे, ता. हवेली, जि. पुणे

**विषयः-** सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भः-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र २४) २०१३
२) शासन निर्णय एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२,मंत्रालय, मुंबई, दि.२६ फेब्रुवारी २०१४
३) शासन निर्णय एसएफएस-१०१४/प्र.क्र.१९९(भाग २)/एसएम-२,मंत्रालय, मुंबई, दि. ६ जून २०१५
४) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचा मान्यता आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंशाळा/मान्यता/पुवि/२०१५-१६/२१११२/१५, दि. ३० जून २०१६

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **श्री लक्ष्मीनारायण ट्रस्ट, रुपीनगर, पिंपरी कॉलनी, पिंपरी, जि. पुणे** | **भगवंती इंग्लिश मेडीयम स्कुल, तळवडे, ता. हवेली, जि. पुणे** | इंग्रजी | माध्यमिक दर्जावाढ | इ. ८ वी | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१४-१५ |

## अटी व शर्ती

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१४-१५ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क.शिऊसं/माध्य-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांकः- 12 MAY 2014

प्रति
अध्यक्ष/सचिव,
श्री लक्ष्मीनारायण ट्रस्ट रुपीनगर पिंपरी कॉलनी पिंपरी

**विषय :- सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत..**

संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. २४) दिनांक २ जुलै २०१३.

२. शासन निर्णय एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २६ फेब्रुवारी २०१४

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०२ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २३१३ | पुणे | श्री लक्ष्मीनारायण ट्रस्ट रुपीनगर पिंपरी कॉलनी पिंपरी | भवगती इंग्लिश मिडी. स्कूल रुपीनगर तळवडे | मराठी | नवीन शाळा | माध्यमिक | २०१४-१५ |

अटी व शर्ती :-

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून १८ (अठरा) महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणांचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१०. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनांस /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता देणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
११. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा / वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यकराहील.
१२. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,पुणे /अहमदनगर /सोलापूर.
प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा.रा.ग.गुंजाळ,अवर सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता दुरुस्त्यांबाबत.

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१४/प्र.क्र.१९९ (भाग २)/एसएम-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२
**दिनांक:- ६ जून,२०१५.**

<u>संदर्भ</u>:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम-२, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४,
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.एसएफएस-१११४/प्र.क्र.१९९/एसएम-२, दिनांक २५ जून, २०१४.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये २३७९ संस्थांच्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. तथापि, सदर शासननिर्णयामध्ये पात्र झालेल्या प्रस्तावांपैकी काही प्रस्तावांच्या शाळांच्या बाबतीत त्यांनी मूळ प्रस्तावांमध्ये मागणी केल्यानुसार अभ्यासक्रम, शाळांचे माध्यम, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. संबंधित संस्थांची निवेदने तसेच, क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता सोबत जोडलेल्या सहपत्रानुसार प्रस्तावांमध्ये दुरुस्ती /सुधारणा करण्यास, संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक २५ जून, २०१४ मधील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१५०६०९१५५११०७५३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.06.09 17:33:23 +05'30'

(राजेंद्र पवार)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. संबधित महानगर पालिकांचे आयुक्त,
३. संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
५. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. विभागांतर्गत सर्व संचालक,
८. संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक,
९. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक),
१०. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई,
११. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका
१२. निवडनस्ती (एसएम-२).

प्रपत्र-क

## शाळेचे माध्यम दुरुस्ती प्रस्ताव

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन २०१२ अंतर्गत सन २०१४-१५ साठी दुरूस्ती प्रस्तावाबाबत.**

| अ क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | संस्थेच्या मुळ अर्जातील माध्यम प्रकार | शासन निर्णय दि. २६.०२.२०१४ व दि.२५.०६.२०१४ नुसार दिलेली परवानगी | नवीन शाळा/ दर्जावाढ | माध्यम | या शासन निर्णयान्वये दिलेली सुधारित मान्यता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | वर्धा | श्री अवधुत बहु.सेवा संस्था,वर्धा | श्री मोतीरामजी शिंदे माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय,मांड गांव ता समुद्रपूर जि वर्धा | इंग्रजी | माध्यमिक ते उच्च माध्यमिक | नवीन शाळा | मराठी | माध्यम इंग्रजी |
| २ | पुणे | श्री लक्ष्मीनारायण ट्रस्ट,रुपीनगर,पिंपरी कॉलनी,पिंपरी जि.पुणे | भगवती इंग्लिश मेडीयम स्कुल,तळवडे ता हवेली जि.पुणे | इंग्रजी | माध्यमिक | दर्जावाढ | मराठी | माध्यम इंग्रजी |
| ३ | बुलढाणा | ज्ञानराज बहु. शैक्षणिक संस्था खामगांव जि.बुलढाणा | श्री गुरुदेव आर्ट, कॉमर्स व सायन्स कॉलेज, रोहणा ता.खामगांव जि.बुलढाणा | मराठी | उच्च माध्यमिक | नवीन शाळा | इंग्रजी | मराठी माध्यम |

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2015.06.09 17:34:08 +05'30'